# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः29.03.2024 वारःशुक्रवार

---

1.लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील पाच मतदारसंघात 110 उमेदवारांचे अर्ज वैध

4.लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना जारी

2.रामटेक लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार रश्मी बर्वे यांचं जातप्रमाणपत्र, जात पडताळणी समितीकडून रद्द

3.राज्याच्या बहुतांश भागात उन्हाची काहिली वाढली; विदर्भ मराठवाड्यात पारा चाळिशीच्या पार

छाननी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्जाची काल छाननी झाली. यात राज्यातील पाच मतदारसंघातल्या 181पैकी 110 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली. पहिल्या टप्प्यातील पाच मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्या म्हणजे 30 मार्चपर्यंत असून या मतदारसंघासाठी 19 एप्रिल रोजी मतदान होईल.

**अर्ज अवैध**

रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र, जात पडताळणी समितीनं अवैध ठरवलं आहे. जातवैधता प्रमाणपत्र मिळवताना कायदेशीर प्रक्रिया पार पडण्यात आलेली नाही, असा दावा करण्यात आला होता. तक्रारीनंतर सामाजिक न्याय विभागानं जात पडताळणी समितीला योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. सामाजिक न्याय विभागाच्या आदेशानंतर जात पडताळणी समितीनं बर्वे यांना नोटीस जारी केली होती. याच नोटिशीला बर्वे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यानंतर बर्वे यांचं जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय पडताळणी समितीनं दिला आहे.

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना काल जारी करण्यात आली. या टप्प्यात देशातल्या १२ राज्यातल्या ८८ जागांसाठी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ - वाशिम, हिंगोली,  नांदेड, आणि परभणी या आठ मतदार संघांचा समावेश आहे.

या टप्प्यासाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. चार एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. ५ एप्रिलला अर्जाची छाननी होईलो; आणि ८ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

**शिंदे गट उमेदवार**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेनेनं ८ उमेदवारांची पहिली यादी काल संध्याकाळी जाहीर केली. त्यात ७ विद्यमान खासदारांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, कोल्हापुरातून संजय मंडलिक, शिर्डीतून सदाशिव लोखंडे, बुलडाण्यातून प्रतापराव जाधव, हिंगोलीतून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे आणि हातकणंगले इथून धैर्यशील माने या विद्यमान खासदारांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा उमेदवारी दिली आहे. रामटेकमध्ये राजू पारवे यांची उमेदवारी आधीच जाहीर झाली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे.

शिवसेनेनं उमेदवारांची नावं अधिकृतपणे जाहीर करण्यापूर्वीच  शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी काल बुलडाणा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज सादर केला; त्यांनी अपक्ष म्हणूनही अर्ज भरला आहे.  दरम्यान हिंदी चित्रपट सृष्टीतले अभिनेता आणि माजी खासदार गोविंदा यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

**राष्ट्रवादी**

राष्ट्रवादी काँग्रेसनं राज्यातल्या निवडणुकीसाठी ३७ प्रमुख प्रचारकांची यादी काल जाहीर केली. यात राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्यासह प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, रामराजे नाईक निंबाळकर, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, धर्मरावबाबा आत्राम आदींचा समावेश आहे.

**रामदास आठवले**

कार्यकर्ते महायुतीवर नाराज असून आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य सन्मान मिळाला पाहिजे, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. रिपाईच्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीनंतर काल पुण्यात झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

**इन्ट्रोबाईट**

मतदार जन जागृती-ptc,ndms-माधवी

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे निवडणूक निरीक्षक अनिमेषकुमार पाराशर यांनी काल निवडणूक अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन आवश्यक निर्देश दिले. मतदानात नवमतदारांचा सहभाग वाढेल यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी सूचना त्यांनी केली.

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनीही काल आढावा बैठक घेऊन  संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. दिव्यांग, तसंच ८५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या मतदारांना घरातून मतदान करण्याची सुविधा वापरता येण्यासाठी १२ ड अर्जांचं वाटप वेळेत पूर्ण करावं असं देवेंदर सिंह यांनी सांगितलं.

सांगलीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात काल टपाली मतदान पत्रिकांबाबत बैठक झाली. सर्व निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी टपाली मतदान प्रक्रिया अत्यंत सूक्ष्मपणे समजून घ्यावी, असं आवाहन जिल्हाधिकारी राजा दयानिधी यांनी केलं.

पालघर आणि बोईसर शहरात काल महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भारताच्या नकाशाची भव्य आणि सुंदर मानवी रांगोळी तयार करून मतदानाबाबत जनजागृती केली. याबाबत अधिक माहिती देताना पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके म्हणाले..

**छत्रपती शिवाजी महाराज**

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी महाराजांच जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीवर विविध सामाजिक संस्थांनी शिवजयंती साजरी केली. रत्नागिरीत 'श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान'तर्फे शिवज्योत दौड आयोजित करण्यात आली होती.

नवी मुंबईतल्या वाशी इथल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिव फाऊंडेशनच्या वतीने शिवकालीन शस्त्रास्त्रांचं प्रदर्शन भरविण्यात आलं होतं.

पुणे आणि अहमदनगरसह राज्याच्या विविध जिल्ह्यातही काल शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली.

**आनंदऋषीजी**

राष्ट्रासंत आचार्य आनंद ऋषीजी यांच्या 32व्या पुण्यतिथीनिमित्त काल अहमदनगरमध्ये शांती फेरी काढण्यात आली. आनंद ऋषीजी यांचं जन्मस्थान असलेल्या शिराळ चिंचोंडी इथून आनंद धामपर्यंत पायी दिंडी काढण्यात आली होती.

**कान- मराठी चित्रपट**

फ्रान्समध्ये होणाऱ्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील एका विभागासाठी तीन मराठी चित्रपटांची निवड झाल्याची माहिती चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी काल दिली. शशी खंदारे दिग्दर्शित 'जिप्सी', श्रीकांत भिडे दिग्दर्शित "भेरा" आणि मनोज शिंदे दिग्दर्शित 'वल्ली' हे चित्रपट कान महोत्सवासाठी निवडण्यात आले आहेत. येत्या 14 ते 22 मे या कालावधीत हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये २०१६पासून महामंडळामार्फत मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा हा या मागचा हेतू आहे.

**नेट**

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ नेट परीक्षेचे गुण, म्हणजेच राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राह्य धरला जाईल.

**पोलिस -नक्षलचकमक**

गडचिरोली आणि छत्तीसगड राज्याच्या सीमेवरील भूमकान गावानजीकच्या जंगलात बुधवारी रात्रभर पोलिस आणि नक्षल्यांमध्ये जोरदार चकमक झाली. पोलिसांनी घटनास्थळावरुन नक्षल साहित्य ताब्यात घेतलं आहे. अंधाराचा फायदा नक्षलवादी घेत जंगलात पसार झाले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घातपात करण्याच्या हेतूने या भागातले नक्षलवादी जंगलात एकत्र आले होते.

**उष्माघात**

राज्याच्या विविध भागात उन्हाच्या झळा तीव्र होऊ लागल्या आहेत. अनेक ठिकाणी मार्च महिन्याच्या सुरूवातीपासूनच उष्णतेची लाट जाणवत आहे. त्यामुळे उष्माघाताची शक्यताही वाढली आहे. गेल्या १५ दिवसात राज्यात १३ रूग्णांना उष्माघाताचा त्रास झाला. यामध्ये सर्वाधिक चार व्यक्ती बीड इथल्या आहेत; अहमदनगर, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपुर, धुळे आणि साताऱ्यातही प्रत्येकी एक रूग्णाची नोंद झाली आहे. जिल्हा, महापालिका आणि नगरपालिकांमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

वाढत्या उन्हाळ्यात नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, वारंवार पाणी प्यावं, शेतात दुपारची कामं टाळावीत, झाडाच्या सावलीचा आधार घ्यावा असं आवाहन धुळे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी केलं आहे.

दरम्यान सातारा शहरासह परिसरातील काही भागात काल दुपारी अवकाळी पावसाने हजेरी लावली.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या अनेक भागात उन्हाची काहिली वाढली आहे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या बहुतांश जिल्ह्यात काल तापमानाचा पारा चाळिशीच्या पार गेला होता. दरम्यान सातारा शहरासह जिल्ह्याच्या काही भागात काल अवकाळी पावसानं हजेरी लावली. येत्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**